# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्कर/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. २३ .०९.२०२०**

**वाचा :-** १. साथरोग प्रतिबंधक कायदा, १८९७
२. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
३. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१
४. मा. मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि. ३१/०८/२०२०
५. या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश दिनांक ०१.०९.२०२०

**विषयः** ताळेबंदी (Lockdown) मधून प्रत्येक रविवारी दुकाने / आस्थपना चालू ठेवण्यासाठी मुभा देणेबाबत.

आदेशः-

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०५ वरील आदेशान्वये नमूद आदेशान्वये नियमावलीसह दिनांक ३०/०९/२०२० पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रासाठी विविध अटी व शर्तीच्या अधिन राहून आस्थापना व दुकाने सोमवार ते शनिवार सकाळी ०९.०० ते सायंकाळी ७.०० पर्यत चालू ठेवण्यास मुभा देण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी नांदेड जिल्हयात **रविवारी बंद** असल्याने दर शनिवारी व सोमवारी गर्दी होत असल्याने व इतर अनुषंगिक व्यवहार सुरळीत राहणेसाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून सदरची गर्दी कमी होण्यासाठी प्रत्येक रविवारी दुकाने आस्थापना चालू ठेवणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ नूसार मला प्रदान अधिकारान्वये मी डॉ.विपीन इटनकर (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी प्रक्रिया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये या आदेशाव्दारे **संपूर्ण नांदेड जिल्हयात यापुढे प्रत्येक रविवारी (सकाळी ०९.०० ते सायंकाळी ७.०० पर्यत) सर्व दुकाने / आस्थापना चालू ठेवण्यासाठी ( Lockdown) ताळेबंदी मधून मुभा देण्यात येत आहे.**

सदरील आदेशाचे पालन न करणा-या व्यक्ती संस्था अथवा समूह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

तसेच वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि. २३.०९.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

स्वाक्षरित/-
**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधिक्षक नांदेड.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
३. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
४. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
५. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
६. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**